पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १२

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०१/२०२०** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०८/०१/२०२०** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
४. मा.बाबर शर्मिला राजू
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर – सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) मा.शहर सुधारणा समिती कार्यपत्रिका क्र.०८ ठराव क्र.१५ दिनांक १३.११.२०१९ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. – मा.कैलास बारणे , मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) झोपडपट्टी धारकांकडून मिळकत कराची नोंदणी करुन घेणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२६/१२/२०१९** (कार्यपत्रिका क्रमांक **११**) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ०८/०१/२०२०
सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

मा.कैलास बारणे , मा.वैशाली घोडेकर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस - १८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७ /९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै. मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ०८/०१/२०२०
सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.कैलास बारणे

मा.वैशाली घोडेकर , मा.कैलास बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरात असणारे संपूर्ण झोपडपट्टी व ज्या ज्या झोपडपट्टी धारकांकडून मिळकत कराकरीता नोंदणीचा अर्ज आल्यास तो अर्ज झोपडपट्टी विभागाने स्विकारुन त्वरीत मिळकत कराची नोंद करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०/२०२०
दिनांक : १८/०१/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.